# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## दिनांक २३/०५/२०२४ (गुरूवार) दुपार

---

### महाराष्ट्र राज्यात प्रतीबंधीत सुगंधीत तंबाखूची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २२/०५/२०२४ चे २२/३० वाजता दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश साखरकर ठाणेदार पोलीस स्टेशन केळवद व त्यांच्या पोलीस स्टाफनि मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरे वरुन मौजा – सावळी फाटा छत्रापुर शिवार NH-47 वर नाकाबंदी करीत असताना मिळालेल्या माहिती प्रमाणे स्कारपिओ कार क्र. एम.एच–१३/डी.एच–१८९३ ही पांढुर्णा कडुन येताना दिसली त्यावरुन सदर स्कारपिओ कारला लाल लाईट चा थांबविण्याचा इशारा केला असता सदर स्कारपिओ चालकाने आपली कार नाकाबंदीचे ठिकाणी थांबविली सदर कारची पाहणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतीबंधीत सुगंधीत तंबाखु १) मन ५ स्टार सुगंधीत तंबाखु चे ५०० ग्राम चे ३० पॉकेट प्रत्येकी २५०/– रुपये प्रमाणे एकुण ७,५००/– रुपये, २) ५३५ जनम सुगंधीत तबांखु चे ५०० ग्राम चे ३९६ पॉकेट प्रत्येकी २५०/– रुपये प्रमाणे एकुन ९९,०००/– रुपये, ३) पान पराग प्रिमियमचे ९६ ग्रामचे ४५ पॉकेट (त्यामध्ये ३२ पाउच प्रत्येकी पाउच ४/– रु) प्रत्येकी पॉकेट किंमत १२०/– रुपये प्रमाणे एकुन ५,४००/– रुपये, ४) रत्ना छाप तंबाखू नं. ३००० चे ३० बॉक्स (त्यामध्ये ५० ग्राम चे १० डब्बे प्रत्येकी डब्बा ११८/– रुपये) प्रत्येकी बॉक्स किंमत ११८०/– रुपये प्रमाणे एकुन ३५,४००/– रुपये, ५) होला हुक्का शिशा तंम्बाखु चे १ किलो ग्राम चे २० पॉकेट प्रत्येकी ८२०/– रुपये प्रमाणे एकुन १६,४००/– रुपये, ६) गोल्डन सफारी RP 999 तंम्बाखु चे ०१ किलो ग्राम चे ३३ पॉकेट प्रत्येकी ५५०/– रुपये प्रमाणे एकुन १८,१५०/– रुपये, ७) ईगल हुक्का शिशा ४०० ग्राम चे ५० पॉकेट प्रत्येकी ६४०/– रुपये प्रमाणे एकुन ३२,०००/– रुपये असा एकुन किंमती २,२५,२१०/– रुपये चा माल व स्कारपिओ कार क्र एम. एच–१३/डी. एच–१८९३ किंमती १०,००,०००/–रुपये असा एकुण १२,२५,२१०/– रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन सदर स्कारपिओ कार क्र. एम. एच–१३/ डी. एच–१८९३ चा चालक सुमेध बंडु खरात वय २६ वर्ष रा. महाडा कॉलनी, फ्लॅट नं ५, बुट्टीबोरी तह. हिंगणा जि. नागपुर असे सांगितले व कारमधील असलेल्या स्वार इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव– हर्षल अशोक पडोळे वय ३३ वर्ष रा. जुनि मंगळवारी, भांडेवाडी, नागपुर या दोन्ही इसमां विरुद्ध कलम १८८, २७२, २७३, ३२८ भादंवी सहकलम अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील कलम २६(२) (१), २६(२)(IV), २७(३)(e), ३०(२) (a), ५९ अन्न सुरक्षा आणी मानके अधि. २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि राकेश साखरकर ठाणेदार पो.स्टे केळवद, पोहवा दिनेश काकडे, पोशि धोंडुतात्या देवकत्ते यांनी केली आहे.




## दुखापत करणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे भिवापूर अंतर्गत अडयाळ ता. भिवापूर येथे दिनांक २१/०५/२०२४ चे २३.०० वा. ते २३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— **रिषभ प्रल्हाद गुरूपुडे, वय २६ वर्ष, रा. अडयाळ ता. भिवापुर जि. नागपुर** व **आरोपी नामे— ईमरान पठाण, वय २५ वर्ष रा. कारगाव ता. भिवापुर जि. नागपुर** हे दिनांक ०६/०५/२०२४ रोजी साईधाम लॉन भिवापुर येथे लग्नाचे कार्यक्रमात गेले व तेथे डिजे मध्ये डांस करतांना फिर्यादीचा धक्का आरोपीला लागला व तेथे तोंडातोंडी होवुन वाद तिथेच मिटला नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा त्याचे मित्रासोबत अडयाळ येथे आला व फिर्यादीचे मित्र अमित नरूले याला फोन करून म्हटले की तुम्ही कुठे आहा असे म्हणुन शिवीगाळ करून धमकी देत होता तेव्हा अमितने सर्व मित्रांना फोन करून तेथे बोलाविले तेव्हा फिर्यादी अडयाळ चौकात गेले असता ईमराण हा दारू पिउन दारूचे नशेत दिसला व त्याचा हातात तलवार सारखा धारदार हत्यार दिसला तेव्हा फिर्यादीने त्याला समजवण्याचा प्रयत्न केला परंतु कोणाचीही काहीही ऐकत नव्हता तेव्हा ईमरान याने फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करून दि. ०६/०५/२४ रोजी जास्त बोलत होता असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ केली तेव्हा फिर्यादीने त्याचे हातातले तलवार सारखे धारदार हत्यार हिसकण्याचा प्रयत्न केले असता फिर्यादीच्या उजव्या हाताच्या बोटाला मार लागला असुन जखम झालेली आहे. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून आरोपीतांविरूद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३२४, २९४, ५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्हयाचे तपासात **आरोपी नामे— ईमरान पठाण, वय २५ वर्ष, रा. कारगाव ता. भिवापुर जि. नागपुर** याचा शोध घेवुन त्यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोहवा प्रविण जाधव हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार पोनि जयप्रकाश निर्मल, पोहवा आनंद धात्रक, नापोशि रवि जाधव, पोशि वासुदेव समर्थ, दिपक ढोले यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**